# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./510
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- ०५.०७.२०२१

*<u>निकाल प्राधान्य/तातडीचे</u>*

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा सन २०२१ - सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार मंडळाच्या संगणकीय प्रणालीत गुणांच्या नोंदीबाबत...**

**संदर्भ :- सोबतचे प्रकटन**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा सन २०२१ साठी सुधारीत मूल्यमापन कार्यपध्दतीसंदर्भात तपशिलवार सूचना सर्व संबंधित माध्यमिक शाळांना या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/माध्य गोप/३७१ दि. १०.०६.२०२१ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थीनिहाय गुण नोंदणी करण्यासाठी मंडळामार्फत प्रथमच संगणकीय प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर प्रणालीमध्ये विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद करताना शाळा स्तरावर काही त्रुटी/चुका राहिल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर त्रुटी/चुकांची पडताळणी करुन भरलेल्या गुणांमध्ये सोबतच्या प्रकटनातील मुददा क्रमांक ०१ ते ०९ पैकी काही चुका/त्रुटी आढळल्यास त्या खालील जिल्हानिहाय नियोजनानुसार या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व सोबत चुका/त्रुटींची दुरुस्ती करण्यासाठी हस्तपोच प्रस्ताव दाखल करण्यात यावेत.

सुधारीत गुण मंडळाकडे देताना त्यांस पुरक मुळ कागदपत्रे, परिशिष्टे, निकालपत्रक/गुणपत्रक इ. कागदपत्रे व त्यांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत आणाव्यात. कागदपत्रांची पडताळणी करूनच प्रस्ताव स्विकारून पुढील कार्यवाही केली जाईल.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १ | सातारा | बुधवार दि.०७.०७.२०२१ |
| २ | सांगली | गुरुवार दि.०८.०७.२०२१ |
| ३ | कोल्हापूर | शुक्रवार दि.०९.०७.२०२१ |

ज्या शाळांनी यापूर्वी मंडळाकडे दुरूस्तीचे प्रस्ताव दाखल केले आहेत त्याचीही पडताळणी करण्यासाठी संबंधित शाळांनी वरीलप्रमाणे कागदपत्रे सादर करून आपापल्या प्रस्तावांची पडताळणी करून घ्यावी.

निश्चित केलेल्या तारखेस चुका/त्रुटींची दुरुस्ती करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिवांकरिता
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**<u>सोबत</u>** - संदर्भीय प्रकटन

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्र क ट न

**विषयः माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१- सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार मंडळाच्या संगणकीय प्रणालीत गुणांच्या नोंदीबाबत..**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१- सुधारित मूल्यमापन कार्यपध्दती संदर्भात तपशिलवार सूचना सर्व संबंधित माध्यमिक शाळा व विभागीय मंडळांना दि.०९/०६/२०२१ च्या राज्यमंडळाच्या परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थीनिहाय गुण नोंदणी करण्यासाठी मंडळामार्फत प्रथमच संगणकीय प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर प्रणालीमध्ये विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद करतांना शाळा स्तरावर काही त्रुटी/चुका राहिल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर त्रुटी/चुकांची पडताळणी करुन यथानियम कार्यवाही करण्याबाबत विभागीय मंडळाना तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी, ज्या माध्यमिक शाळांना संगणक प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद करताना पुढील अडचणी आलेल्या आहेत, त्यांनी त्या संबंधिच्या मूळ अभिलेखासह दि.०५.०७.२०२१ ते दि. ०९.०७.२०२१ या कालावधीत संबंधित विभागीय मंडळाशी त्यांनी निश्चित केलेल्या नियोजनानुसार संपर्क साधावा.

१. संगणक प्रणालीमध्ये विहित मुदतीत काही विद्यार्थ्यांचे गुण भरलेले नाहीत.
२. विद्यार्थीनिहाय गुण भरले, निश्चित (Confirm) केले नाहीत.
३. विद्यार्थीनिहाय गुण भरले, निश्चित (Confirm) केले पण त्रुटी राहील्या/चुका झालेल्या आहेत.
४. विद्यार्थ्यांचे एखादया विषयाचे/ भागाचे गुण/श्रेणी भरलेले नाहीत.
५. इयत्ता ९ वी/ इ.५ वी ते ९ वी (लागू असल्याप्रमाणे) टक्केवारी भरलेली नाही.
६. पुनर्परिक्षार्थीच्या बाबतीत श्रेणी विषयाची श्रेणी दर्शवितांना सध्याच्या तीन श्रेणी विषयांव्यतिरिक्त विद्यार्थ्याचे जुने श्रेणी विषय असल्यास ४ श्रेणी /१,२,३ श्रेणी दर्शविण्यात आलेली आहे.
७. उशीराने आवेदनपत्र भरल्यामुळे बैठक क्रमांक प्राप्त झाला नाही व त्यामुळे संगणक प्रणालीत विद्यार्थ्यांचे गुण/श्रेणी भरता आले नाही.
८. आवेदन पत्र भरताना परीक्षार्थी प्रकार (१. नियमित २. पुनर्परिक्षार्थी ३. खाजगी ४. तूरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी) चुकल्याने संगणक प्रणालीत गुण/श्रेणी भरता आले नाही.
९. आवेदन पत्र भरताना विद्यार्थ्यांना विषयास सूट असताना प्रविष्ट दाखविणे/प्रविष्ट असताना सूट दाखविणे यामुळे संगणक प्रणालीत गुण/श्रेणी भरता आले नाही.

तरी, उपरोक्तबाबत सर्व मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा, शिक्षक व इतर सर्व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

दि.०२/०७/२०२१

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

Scanned by TapScanner